RNI NO. MAHMAR/2020/84035

**कायदेविषयक मार्गदर्शन मोफत**
संपर्क
अॅड . सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

**दि. ३ मे 2026**



1950- नवी दिल्ली येथे बुद्ध जयंतीच्या कार्यक्रमात डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.
1936- डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नागपूर येथे भव्य स्वागत, मिरवणूक व म्युनिसिपालिटीच्या वतीने मानपत्र. संकलन प्रा. यशवंत दुपटे

रविवार, ३ मे २०२६ | वर्ष : ६ | अंक : १२३ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Sunday, 3 May 2026 | Year : 6 | Issue : 123 | Daily | Rate: Rs. 5/-

# बारावीचा निकाल 89.79 टक्के



**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल 89.79 टक्के निकाल लागला. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे 2.9 टक्क्याने निकाल घटला आहे. कोकण विभागाचा सर्वाधिक 94.14 टक्के, लातूर विभागाचा सर्वांत कमी 84.14टक्के निकाल लागला.

राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी राज्य मंडळात झालेल्या पत्रकार परिषदेत निकाल जाहीर केला. मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, बालभारतीच्या संचालक अनुराधा ओक, योजना संचालक कृष्णकुमार पाटील, माध्यमिक सहसंचालक डॉ. श्रीराम पानझाडे, कोल्हापूर विभागीय मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर या वेळी उपस्थित होते.

गेल्यावर्षी बारावीचा निकाल 91.88 टक्के लागला होता. दरवर्षीप्रमाणेच यंदाही मुलींनीच निकालात बाजी मारली आहे. 93.25 टक्के मुली, तर 86.80 टक्के मुले उत्तीर्ण झाली. त्यामुळे मुलांच्या तुलनेत 6.35 टक्के अधिक मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. परीक्षा घेण्यात आलेल्या 154 विषयांपैकी 26 विषयांचा निकाल 100 टक्के लागला.

**शाखानिहाय निकाल**
विज्ञान - 96.44 टक्के
कला - 78.02 टक्के
वाणिज्य - 87.04 टक्के,
व्यवसाय अभ्यासक्रम - 82.74 टक्के
आयटीआय - 81.78 टक्के

विद्यार्थी, पालकांनी कोणताही ताण न घेता विद्यार्थ्यांनी निकाल स्वीकारावा. असे त्रिगुण कुलकर्णी यांनी सांगितले.

## कोकण बोर्ड सलग 15 व्या वर्षी राज्यात अव्वल

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी-मार्च 2026 च्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत कोकण विभागीय मंडळाने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. तब्बल 94.14 टक्के निकालासह कोकण बोर्डाने सलग 15 व्या वर्षी राज्यात प्रथम येण्याचा मान पटकावला असून, स्थापनेपासून अव्वल स्थान टिकवून ठेवण्याची परंपरा यंदाही कायम राहिली आहे.
रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत कॉपीमुक्त आणि शिस्तबद्ध वातावरणात परीक्षा पार पडल्याने या निकालाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याने 95.94 टक्क्यांसह आघाडी घेतली, तर रत्नागिरी जिल्ह्याचा निकाल 93.18 टक्के लागला. मागील वर्षाच्या तुलनेत 2.6 टक्क्यांची किरकोळ घट झाली असली, तरी राज्यातील इतर विभागांच्या तुलनेत कोकणने अव्वल स्थान कायम राखले आहे.
यंदाही मुलींनी निकालात आघाडी घेतली आहे. मुलींचा उत्तीर्णतेचा टक्का 96.78 इतका असून मुलांचा टक्का 91.53 इतका आहे. म्हणजेच मुली मुलांपेक्षा 5.25 टक्क्यांनी पुढे आहेत. विभागातून एकूण 21,548 विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

## नागपूर विभाग राज्यात शेवटच्या स्थानी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता बारावीच्या निकालात नागपूर विभागाने मागिल वर्षाच्या तुलनेत निकालात घट झाली आहे. राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नागपूर विभागाच्या इयत्ता बारावीच्या निकालात मागील वर्षा 1.6 टक्क्यांनी घट झाली होती. तसेच राज्यात नागपूर विभाग तिसऱ्या वर्षीही 92.12 टक्क्यांसह आठव्या क्रमांकावरच होता. यंदाही म्हणजे चौथ्या वर्षीही नागपूर विभाग आठव्या क्रमांकावरच आहे. तसेच राज्यात नागपूर विभाग 88.67 टक्क्यांसह आठव्या क्रमांकावरच आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही निकालामध्ये मुलींनी बाजी मारली आहे. यावर्षी कॉपीमुक्त अभियानाचा निकालावर मोठा परिणाम झाल्याचे दिसून येते. विभागात कॉपी करणाऱ्यांची संख्या फारच कमी होती. त्याचा परिणाम म्हणून निकालात काहीशी घट झाल्याची माहिती विभागीय अध्यक्षांनी दिली. नागपूर विभागातून 1 लाख 53 हजार 256 नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी 1 लाख 52 हजार 230 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी 1 लाख 34 हजार 988 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांची टक्केवारी 88.67 इतकी आहे. करोना काळात नागपूर विभागाच्या निकालाची टक्केवारी ही 97 टक्क्यांपर्यंत गेली होती. मात्र, चार वर्षांपासून या सवलती बंद होताच निकालात घसरण झाली आहे.

# दुबईत फुले-आंबेडकर जयंती सोहळा

## सामाजिक न्याय व आत्मसन्मानाचा संदेश



**दुबई :** गल्फ फुले-अंबेडकर-पेरियार सेल्फ-रिस्पेक्ट मिशन (GPAPRM) च्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम बर दुबई येथील हीरा हॉटेलमध्ये उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख अतिथींच्या स्वागताने झाली. यामध्ये के. कृष्णा (संस्थापक, GWC), नरेश (इंजिनियर) आणि प्रशांत भेले (मेकॅनिकल इंजिनियर व BAMCEF कार्यकर्ता) यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात प्रेरणादायी गीते आणि सांस्कृतिक सादरीकरणाद्वारे उपस्थितांना प्रेरणा देण्यात आली. बुद्धेश्वाय जैसा भीमराव बोले यांसारख्या गीतांनी वातावरण भारावून गेले. प्रेरणादायी व्याख्यानांमध्ये वेंकटेश यांनी डॉ. आंबेडकरांची विचारधारा या विषयावर मार्गदर्शन केले. तर प्रशांत भेले यांनी आपल्या भाषणात पूर्वजांच्या संघर्षाची जाणीव ठेवून त्यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. त्यांनी "Time, Talent, Treasure" या तत्वावर कार्य करण्याचे महत्व अधोरेखित केले. मुख्य अतिथी के. कृष्णा यांनी तेलंगणातील कामगारांच्या उन्नतीसाठी सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती देत गल्फ चॅरिटेबल सोसायटी (GCS) च्या माध्यमातून यूएईतील गरजू, विशेषतः दक्षिण भारतीय बांधवांना दिल्या जाणाऱ्या मदतीचा उल्लेख केला. तसेच फुले-आंबेडकर-पेरियार विचारधारेचा प्रसार करण्यावर त्यांनी भर दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी किरण अन्ना, वेंकटेश, सुमन, रवि, गोपी व इतर सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.
सामाजिक न्याय, आत्मसन्मान आणि बंधुभावाचा संदेश देणारा हा कार्यक्रम दुबईतील बहुजन समाजासाठी प्रेरणादायी ठरला.

# आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात आज आंदोलन; संविधान चौकात नारे-निदर्शने

**नागपूर :** आरक्षण बचाव कृती समितीच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाविरोधात रविवार, दि. 3 मे 2026 रोजी संविधान चौक येथे भव्य आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी 5 ते 7 या वेळेत होणाऱ्या या आंदोलनात विविध संघटना सहभागी होणार असून नारे-निदर्शने करून शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदविण्यात येणार आहे.
आंदोलनकर्त्यांच्या मते, महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या दिशेने पावले उचलली असली, तरी संबंधित बदर समितीचा अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नाही. या पार्श्वभूमीवर अनुसूचित जातींमध्ये फूट पाडण्याच्या धोरणाविरोधात हा लढा उभारण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. या आंदोलनाद्वारे शासनाकडे काही प्रमुख मागण्या मांडण्यात येणार आहेत.
आरक्षणातून मिळालेले हक्क अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रितम बुलकुंडे, स्मिता कांबळे, अतुल खोब्रागडे, आकाश मून, छाया खोब्रागडे, दिनेश अंडरसहारे, वैभव कांबळे, तक्षशिला वाघधरे, पफुल भालेराव, साहेबराव शिरसाट, विश्वास पाटील, स्वप्नील हुमणे, ज्योती संघर्ष नाईक, अॅड. भावना जेठे, इंजी. प्रदीप नागरारे, इंजि. अरविंद गेडाम, अमान कांबळे, कल्पना मेश्राम, विभावरी गजभिये आदी कार्यकर्त्यांनी केले आहे. हे आंदोलन कार्यक्रम नागपूरमध्ये आरक्षण विषयावर मोठ्या प्रमाणात जनजागृती निर्माण करणार असल्याचे चित्र आहे.

# आंबेडकरी विचारवंत कवी का.रा. वालदेकर यांचे निधन

## सांस्कृतिक चळवळीत शोककळा



**नागपूर :** आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत, कवी व लेखक का.रा. वालदेकर यांचे वयाच्या 76 व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने आंबेडकरी सांस्कृतिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.
'मुक्तिवाहिनी'चे आधारस्तंभ म्हणून ओळख असलेल्या वालदेकर यांनी आपल्या लेखनातून सामाजिक प्रश्नांवर प्रभावी भाष्य केले. 'चवदार तळ्यातील अग्निफुले' या कवितासंग्रहासह 'महार आणि मराठे : सांस्कृतिक अनुबंध' तसेच 'लॉंग मार्च : आक्षेप आणि उत्तर' या वैचारिक पुस्तकांद्वारे त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले. ते आंबेडकरी विचारधारेचे निष्ठावंत पुरस्कर्ते होते. त्यांच्या लेखनातून सामाजिक न्याय, समता आणि परिवर्तनाचा संदेश देण्यात आला.

### दैनिक बहुजन सौरभ तर्फे भावपूर्ण आदरांजली

**नागपूर :** दैनिक बहुजन सौरभ मध्ये सातत्याने लिखाण करणारे, कवी, साहित्यिक तसेच नामांतर आंदोलनातील जिद्दी योद्धा का. रा. वालदेकर यांच्या निधनाने बहुजन चळवळीला मोठी पोकळी निर्माण झाली आहे. का. रा. वालदेकर यांनी दैनिक बहुजन सौरभच्या भूमिका व दिशेबाबत सुरुवातीला उपस्थित केलेल्या सर्व शंकांचे समाधान झाल्यानंतर त्यांनी या दैनिकाशी आपुलकीचे नाते जोडले आणि ते नियमित वाचक बनले. त्यांनी संपादक मंडळाला उत्तर नागपूर येथील त्यांच्या निवासस्थानी भेटीसाठी निमंत्रित करून आपला जिव्हाळा व्यक्त केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या विचारधारेनुसार त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित भावनेने समाजकार्यास अर्पण केले. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनात त्यांचा सक्रीय व लढाऊ सहभाग राहिला. शासकीय सेवेत कार्यरत असतानाही त्यांनी आंबेडकरी चळवळीला भक्कम पाठबळ देत उल्लेखनीय योगदान दिले. त्यांच्या जाण्याने सामाजिक, साहित्यिक आणि आंबेडकरी चळवळीतील एक निष्ठावंत कार्यकर्ता हरपला आहे.
दैनिक बहुजन सौरभ परिवाराच्या वतीने मुख्य संपादक अॅड. डॉ. सिद्धार्थ कांबळे, निवासी संपादक सध्या राजुरकर, कार्यकारी संपादक विलास गजभिये, सहयोगी संपादक नागेश बुरबुरे तसेच संचालक मंडळाने का. रा. वालदेकर यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली आहे.त्यांचे कार्य आणि विचार सदैव प्रेरणादायी राहतील, अशा शब्दांत त्यांना कृतज्ञ अभिवादन करण्यात आले.

## ग्रामगीतेतून संविधान चिंतनाचा संदेश

# नागपुरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामजयंती पुरस्कारांचे वितरण

**प्रा. संध्या राजूरकर सन्मानित**



**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा वारसा आणि ग्रामगीतातील मूल्यांचा संदर्भ देत भारतीय संविधानाचे चिंतन मांडण्यात आले. प्रख्यात विचारवंत देविदास घोडेस्वार यांनी ग्रामगीता ही मानवी जीवनाचे संविधान असून भारतीय राज्यघटना देशकारभाराचा मार्गदर्शक आहे, असे प्रतिपादन केले. घोडेस्वार यांनी सांगितले की, तुकडोजी महाराजांचे औपचारिक शिक्षण मर्यादित असले तरी समाजव्यवस्थेचा त्यांचा सखोल अभ्यास त्यांच्या साहित्य व भजनांतून स्पष्ट दिसतो. सक्षम ग्रामसभा आणि लोकसहभागाचा विचार त्यांनी प्रभावीपणे मांडला.
दरम्यान, श्रीगुरुदेव सेवा मंडळ यांच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामजयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.
या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाहीविषयक विचारांचा उल्लेख करत घोडेस्वार यांनी व्यक्तीपूजेचा विरोध केला. लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर व्यक्तीपूजा टाळली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.
पुरस्कार वितरण सोहळा विधानपरिषद सदस्य प्रवीण दटके व आमदार अभिजीत वंजारी यांच्या हस्ते पार पडला. अध्यक्षस्थानी सेवाश्रमाचे अध्यक्ष अॅड. अशोक यावले होते.
यावेळी विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले. शहर विभागातील राष्ट्रसंत विचार प्रसार सेवा पुरस्कार आकाश निस्ताने (नागपूर) यांना, तर ग्रामीण विभागासाठी पुरुषोत्तम बैसकार (यवतमाळ) यांना प्रदान करण्यात आला. तसेच संस्था स्तरावर राष्ट्रसंत विचार साहित्य परिषद (चंद्रपूर) व श्रीगुरुदेव व्यायाम शिक्षण व सेवा मंडळ (गडचिरोली) यांना गौरविण्यात आले. पत्रकारिता क्षेत्रात देशभक्त वामनराव गावंडे स्मृती पुरस्कार संध्या राजूरकर (निवासी संपादक दैनिक बहुजन सौरभ) यांना, तर श्याम लोहबरे स्मृती पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार अनिल फेकरीकर यांना प्रदान करण्यात आला. संगीत क्षेत्रातील योगदानासाठी संगीतरत्न अन्नाजी माहुलकर स्मृती पुरस्कार प्रमोद पोकळे (बडनेरा) यांना देण्यात



आला. तसेच आदर्श ग्रामपंचायत पुरस्कार कवठा (म्हसाळा) ग्रामपंचायतीला प्रदान करण्यात आला. यावेळी बहुजन सौरभचे मुख्य संपादक अॅड. डॉ. सिद्धार्थ कांबळे, ज्ञानेश्वर रक्षक, विठ्ठल फुलसे, संगिता जावळे, डॉ. बाळ पदवाड, कांचन चव्हाण आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन राजेश कुंभलकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन दिलीप सुरकार गुरुजी यांनी मानले.
हा कार्यक्रम राष्ट्रसंतांच्या विचारांचा प्रसार आणि सामाजिक मूल्यांची जपणूक करण्यासाठी प्रेरणादायी ठरला.

**बुद्ध पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!**



शुभेच्छूक : अॅड. बाबुलाल मेश्राम, कुकडे ले-आऊट,
डॉ. सुजाता खंडाईत,
इंजि. चंद्रशेखर मेश्राम,
इंजि. आशिष दमके,
प्रा. विकास शेंडे.





जगाला युद्धाची नव्हे तर बुद्धांची गरज आहे.

**बुद्ध पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!**

आई ( कसिस ) फाउंडेशन
आनंद म्हस्के - अध्यक्ष
किरण भंडारे - सचिव
राजाराम शिखरे - कोषाध्यक्ष



“ जेवढे शांत राहाल तेवढे आनंदी राहाल.
शांतता हीच खरी शक्ती आहे... ”



# चवदार तळ्यातील अग्निफुलांचे काव्य आविष्कारणारा कवी : का. रा. वालदेकर






डॉ. मच्छिंद्र चोरमारे
मो. 9423153321

ज्येष्ठ कवी का.रा.वालदेकर हे बुद्ध तत्त्वज्ञानाशी प्रामाणिक राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सांस्कृतिक अभिसरणाची सशक्त कविता लिहिणारे प्रतिभावान कवी होते. आपले चिंतन, आकलन आणि अनुभवविश्व त्यांनी कवितेसोबतच वैचारिक वाङ्‌यातून अभिव्यक्त केले. 'चवदार तळ्यातील अग्निफुले', 'महार आणि मराठेः सांस्कृतिक अनुबंध,' लॉंगमार्च : आक्षेप आणि उत्तर' या पुस्तकातून त्यांनी आंबेडकरनिष्ठ दलित साहित्यात मोलाची भर घातली.

का.रा.वालदेकर यांच्या घराच्या जवळच माझे वास्तव्य असल्याने साहित्यिक आणि कौटुंबिक स्नेहाचे नाते होते. प्रत्येक भेटीत, कवीसंमेलनात अथवा कार्यक्रमात ते साहित्याविषयी फार गंभीरपणे चर्चा करायचे. मुक्तीवाहिनी विषयी भरभरून बोलायचे. आगामी लेखनाच्या प्रकाशनासंदर्भात चर्चा करायचे. आगामी पुस्तक त्यांचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची परखड चिकित्सा करणारे आहे. ते लवकरच प्रकाशित व्हावे म्हणून नागपूरातील एका प्रकाशकांशी मी भेट घालून दिली होती. का.रा.वालदेकरांच्या वैचारिक लेखनाला अभ्यास आणि संशोधनाची शिस्त होती. त्यांच्याशी चर्चा करताना ते जाणवायचे. मुक्तीवाहिनीची स्थापना कशी झाली याविषयी 'मुक्तीवाहिनीची जन्मकथा' त्यांचा हा लेख मूळातून समजून घेण्यासारखा आहे. तो मुक्तीवाहिनीसह इतर वाङ्‌यीन चर्चा सुध्दा घडवून आणतो आणि पुढील पिढीला मार्गदर्शक ठरतो. तसेच पीडब्ल्युएस कॉलेजमध्ये झालेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनाच्या आयोजनाविषयीचा 'दलित साहित्य संमेलन : इतिहास आणि फलश्रृती' हा लेखही ऐतिहासिक उजाळा देणारा ठरतो. मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनासंदर्भात का.रा.वालदेकरांनी विस्तृत नऊ लेख लिहिले होते. नामांतर आंदोलनाचा तो ऐतिहासिक लेखनठेवा वाचकांना मार्गदर्शक ठरणारा आहे. जयभीम साप्ताहिक, आंबेडकर समाजची स्थापना, दलित साहित्य प्रचिती आणि आविष्कार या अनुषंगाने होणारी साप्ताहिक बैठक आणि सखोल चर्चा. या विषयी का.रा.वालदेकरांचे लेखन उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी वाचकांनी ते मूळ लेखन आवर्जून वाचले पाहिजे. दलित साहित्य प्रचिती आणि आविष्कार या शिर्षाकांतर्गत होणाऱ्या बैठका आणि चर्चा दलित साहित्याच्या संदर्भात अतिशय मूलगामी होत असत. ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत ताराचंद्र खांडेकर आणि का.रा.वालदेकर यांच्यात नोकरीच्या ठिकाणी रिझर्व्ह बँकेत विचारविनिमय व्हायचा. या बैठकांना एखादे संस्थात्मक स्वरूप असावे असे खांडेकरांना वाटत असे. तेव्हा त्यासाठी 'मुक्तीवाहिनी' असे का.रा.वालदेकर यांनी सुचविलेले नाव योग्य वाटले आणि 7 नोव्हेंबर 1974 साली मुक्तीवाहिनीची स्थापना झाली. ही संस्था ताराचंद्र खांडेकर, इ.मो.नारनवरे, का.रा.वालदेकर, सरसेनापती प्रा.जोगेंद्र कवाडे, नरेंद्र शेलार, धर्मराज निमसरकर, बबन चहांदे, डब्ल्यु कपूर आदी निष्ठावंतांनी हिरीरीने चालवली. अशी माहिती देणारे का.रा.वालदेकरांचे लेखन उपलब्ध आहे.

'चवदार तळ्यातील अग्निफुले' हा का.रा.वालदेकरांचा पहिला कवितासंग्रह 2003 साली प्रकाशित झाला. या संग्रहात एकूण 53 कवितांचा सामावेश असून आंबेडकर तत्त्वज्ञान प्रेरणास्थानी ठेवून काव्यलेखन केले आहे. या संग्रहाला ताराचंद्र खांडेकर यांनी अतिशय अभ्यासपूर्ण आणि चिंतनशील प्रस्तावना लिहिली आहे. त्यात ते म्हणतात - 'वालदेकरांची कविता हा एक क्रांतदर्शी सांस्कृतिक अभिसरणाचा प्रवास आहे. खरे म्हणजे वालदेकर केवळ कविताच नव्हे तर अन्य वाङ्‌मयप्रकारही तेवढ्याच सामर्थ्याने हाताळता. त्याचे कारण म्हणजे जीवन, साहित्य आणि तत्त्वज्ञान यांचे वालदेकराचे आकलन अस्सल, विवेकनिष्ठ आणि कल्याणकारी जाणिवांनी ओतप्रोत आहे. मुक्तीवाहिनीच्या आंबेडकरी सम्यक जाणिवांच्या प्रयोगशाळेतील रसायनाने वालदेकरांचे हृदय, मन आणि बुद्धी संपृक्त झालेली आहेत. त्याचे प्रत्यंतर त्यांच्या 'चवदार तळ्यातील अग्निफुले' या काव्यसंग्रहात प्रकर्षाने येते. 'वालदेकरांच्या कवितेचे प्राणतत्त्व ताराचंद्र खांडेकरांनी प्रास्तावनेतून उजागर केले आहे.

मरणगंध नावाच्या कवितेत वालदेकर म्हणतात -

'हा मरणगंध
का चौफेर दाटून येतोय
चक्रीवादळासारखा?
श्वासांचे बंध
खरेच का इतके पक्के असतात
जमिनीत मुरून गेलेल्या
पावसाच्या पाण्यासारखे, अतुट?
नाळ तुटली की दुःखाशी नाते जुळते
हे नाळ तुटल्यावरच का कळते?'

जीवन आणि दुःख यावर प्रत्यंकारी भाष्य करणारी ही कविता आहे. समाज, संस्कृती, राजकारण, परिवर्तन असे पुष्कळ विषय का.रा.वालदेकरांची कविता हाताळताना दिसते. आंबेडकर चौक नावाची प्रा.सिध्दार्थ तांबे यांची प्रसिद्ध कविता आहे. शहरातील चौकाविषयी तेथील जमलेल्या कष्टकरी मजूरांविषयी अनेकांनी कविता लिहिल्या. भारतीय संविधानाच्या सन्मानार्थ नागपूरात एकमेव संविधान चौक आहे. हा चौक डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी जसा आहे तसा तो आंदोलन आणि संघर्ष करण्यास प्रेरित करणारा सुद्धा आहे. का.रा.वालदेकरांनी 'संविधान चौक' नावाची कविता लिहून आंबेडकर जीवनदृष्टीचे दर्शन घडविले आहे.

ते म्हणतात - 'संविधान चौक
वैचारिक मंथनाचा केंद्रबिंदू, सृजन सिंधु
साहित्य सर्जक करतात अभिवादन
जागृतीचा अग्नी प्रसवतात गीतातून
बुद्धाची करुणा झरते शब्दांतून
प्रज्ञावंतांचे आंबेडकरी संविधान विचारपीठ
डॉ. बाबासाहेबांच्या पायाजवळ
पेटवलेल्या मेणबत्त्यांतून पाझरतो
प्रज्ञा शील करुणा मैत्रीचा प्रकाश
'अत्त दीप भव' ची गुंजते बुद्धवाणी संविधान चौकात.'

अशी ही संविधान चौकाला केंद्रवर्ती ठेवून बाबासाहेबांच्या समग्र परिवर्तनाची जाणीव करून देणारी कविता वालदेकरांनी लिहिली आहे. वालदेकर हे स्वभावाने हसतमुख असले तरी त्यांच्या वाणीत गंभीरता होती. चर्चेत अभ्यासपूर्ण चिंतन होते. त्यांची कविता उथळ नसून तिला भक्कम असा वैचारिक पाया आहे. बुद्ध आणि आंबेडकर तत्त्वज्ञानावर ती अढळपणे उभी आहे. 5 डिसेंबर 1949 रोजी जन्मलेल्या ह्या चिंतनशील कवीने बुद्ध पौर्णिमेच्या रात्री शेवटचा श्वास घेतला. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन! ■■

# हृदयस्पर्शी बुद्ध, भीम गीते




विलास गजभिये
मो. 9421588901



हजारो हृदयस्पर्शी बुद्ध भीम ऐकून मी पण एक गीत लिहले. त्या गाण्याला संगीतकार यांनी लयबद्ध करून दिले. मनाला सुखद आनंद झाला.

**जयंती गीत**

(धृपद / Chorus)
गाण्यातून जयंती, नाचून झाली
बेधुंद होऊन जयंती झाली
अभिवादन, अभिवादन
तुला लाखो अभिवादन ।

(कडवे 1)
रक्तात रक्तात तुझेच ऋण
उपकारांची आहे जाण
हृदयात तुझीच ओळख
जयंतीत करतो वंदन
अभिवादन, अभिवादन
तुला लाखो अभिवादन ।

(कडवे 2)
तुझेच गीत आम्ही गाऊ
माणुसकीचा दीप लावू
चित्राच्या त्या रंगछटातून
शब्दांनी तुला सजवू
अभिवादन, अभिवादन
तुला लाखो अभिवादन ।

(ब्रिज)
तुझ्या विचारांची ज्योत पेटली
अंधार सारा दूर पळाली
एकतेची ही वाट धरू
तुझ्या स्वप्नांना साकार करू

(अंतिम धृपद)
गाण्यातून जयंती, नाचून झाली
बेधुंद होऊन जयंती झाली
अभिवादन, अभिवादन
तुला लाखो अभिवादन !!

भारतीय समाजजीवनात गीत, काव्य आणि लोकसंस्कृती यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. आंबेडकरी चळवळीत 'बुद्ध-भीम गीते' ही केवळ कलात्मक अभिव्यक्ती नसून सामाजिक जागृती, परिवर्तन आणि आत्मसन्मानाची प्रबळ साधने ठरली आहेत. ज्ञात-अज्ञात कवी, शाहिर, गीतकार आणि कलावंतांनी आपल्या लेखणी व कंठातून जो विचारांचा झरा वाहिला, तो आजही पुढील पिढ्यांसाठी दीपस्तंभासारखा मार्गदर्शक ठरत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारतीय संविधानाचे शिल्पकार नव्हते, तर ते एक महान विचारवंत, अभ्यासक आणि कलाप्रेमी व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपल्या आयुष्यात ज्ञान, समता आणि बंधुता यांचा संदेश दिला. त्यांच्या कार्याचा प्रभाव इतका व्यापक होता की त्यांच्या हयातीत आणि महापरिनिर्वाणानंतरही असंख्य काव्य, गीते, कादंबऱ्या आणि साहित्यनिर्मिती झाली. डॉ. बाबासाहेब स्वतः म्हणायचे, 'माझी दहा भाषणे आणि शाहीराचे एक गाणे बरोबरीचे आहे.' ही त्यांच्या दृष्टीने कलेची ताकद आणि समाजपरिवर्तनातील तिचे स्थान अधोरेखित करणारी महत्त्वपूर्ण भूमिका होती. महाराष्ट्राला संत, समाजसुधारक आणि विचारवंतांची समृद्ध परंपरा लाभली आहे. त्याचबरोबर शाहीर, गायक आणि गीतकारांचीही एक प्रभावी परंपरा आहे. या परंपरेतून भीमगीतांनी समाजाच्या कानाकोपऱ्यात पोहोचून विचारांची पेरणी केली. 'उद्धरली कोटी कुळे', 'जग बदल घालुनी घाव', 'भीमराया घे तुझ्या लेकराची वंदना' यांसारखी गीते केवळ शब्दरचना नसून ती भावनांची, संघर्षाची आणि कृतज्ञतेची जिवंत साक्ष आहेत. वामनदादा कर्डक, अण्णा भाऊ साठे, सुरेश भट, मंगेश पाडगावकर यांसारख्या दिग्गजांनी आपल्या लेखणीतून आंबेडकरी विचारांना शब्द दिले. त्यांच्या गीतांमध्ये डॉ. बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव, समतेचा संदेश आणि नव्या समाजरचनेचे स्वप्न स्पष्टपणे दिसते.

14 ऑक्टोबर 1956 रोजी दीक्षाभूमी नागपूर धर्मांतर येथे डॉ. बाबासाहेबांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. हा केवळ धार्मिक बदल नव्हता, तर सामाजिक क्रांतीचा नवा विचार होता. या घटनेनंतर भीमशाहीरीला नवे बळ मिळाले आणि समाजात परिवर्तनाचा संदेश पोहोचविण्याची जबाबदारी शाहिरांनी आपल्या खांद्यावर घेतली. बी. काशीनंद हे आंबेडकरी चळवळीतील एक प्रख्यात लोककवी होते. त्यांचे आयुष्य संघर्षमय असले तरी त्यांनी आपल्या काव्यातून समाजाला दिशा दिली. 'पेटता पेटता बोलली रे चिता', 'आई म्हणे लेकराला', 'पाहूनी भीमाचे ज्ञान बोले इतिहासाचे पान' यांसारख्या गीतांतून त्यांनी समाजातील वेदना, आशा आणि जागृती व्यक्त केली. त्यांची गीते केवळ मनोरंजनासाठी नव्हती, तर समाजमनाला विचार करायला भाग पाडणारी होती. त्यांच्या लेखनात समतेची जाणीव, संघटनेचे महत्त्व आणि परिवर्तनाची दिशा स्पष्ट दिसते.

भीमगीतांचा प्रभाव इतका खोल आहे की ती ऐकताना श्रोत्यांच्या मनात नवचैतन्य निर्माण होते. 'कालचे सारे मुके, आज बोलू लागले' ही ओळ केवळ काव्य नसून सामाजिक परिवर्तनाची जिवंत अनुभूती आहे. डॉ. बाबासाहेबांनी बहिष्कृत, उपेक्षित आणि वंचित समाजाला दिलेल्या नवजीवनाची कृतज्ञता या गीतांतून व्यक्त होते.

आज महाराष्ट्रातील प्रत्येक चौकात, वस्तीमध्ये आणि बुद्ध विहारांमध्ये डॉ. बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त किंवा बुद्ध जयंतीनिमित्त भीमगीतांचा सांस्कृतिक जलसा होताना दिसतो. पहाटेपासून सुमधुर गीतांजलीतून विचारांची मशाल प्रज्वलित केली जाते. ही परंपरा केवळ सांस्कृतिक नसून सामाजिक बांधिलकी आणि विचारप्रसाराची सशक्त परंपरा आहे. भीमगीतांचा हा अनमोल ठेवा म्हणजे जागृतीचा धगधगता अग्नी होय. हा आवाज समाजाला सतत प्रबोधित करतो, नव्या पिढीला दिशा देतो आणि समतेच्या वाटेवर चालण्याची प्रेरणा देतो. साहित्य, काव्य, गीत या सर्व माध्यमांतून डॉ. बाबासाहेबांनी दिलेला 'बुद्ध' हा सर्वात मोठा संदेश आहे. शांती, समता आणि मानवतेचा.

आजच्या काळातही, जेव्हा समाज अनेक आव्हानांना सामोरे जात आहे, तेव्हा भीमगीतांची ही परंपरा अधिकच महत्त्वाची ठरते. कारण ही गीते केवळ इतिहास सांगत नाहीत, तर भविष्य घडविण्याची प्रेरणाही देतात. महाकवी लोकप्रिय गायक वामनदादा कर्डक, लक्ष्मण केदार, श्रावण यशवंते, गोविंद म्हशीलकर, विठ्ठल उमप, श्रीधर ओहोळ, कवी उत्तम मुळे, बी. काशीनंद, कवी रंगराज लांजेवार, राजानंद गडपायले, भीमराव शिजवळ, नागोराव पाटणकर, प्रल्हाद शिंदे, आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, हितेंद्र जाधव, विष्णु शिंदे, प्रा. अनिलकुमार खोब्रागडे, आदर्श शिंदे, छाया वानखेडे गजभिये, डॉ. सुधीर भगत, ॲड. संदेश भालेकर, सुरेश भट, प्रतापसिंग बोदोडे, शांताराम नांदगावकर, रंजना शिंदे, राष्ट्रपाल सावंत, कडूबाई खरात, छोटे बाबू, प्रकाश पाटणकर, राजेश शिर्के, डॉ. रमेश थेटे, किरण पाटणकर, शाहीर संभाजी भगत, अनिरुद्ध शेवाळे, संगीतकार पंडित प्रभाकर धाकडे गुरुजी तसेच जाधव सिस्टर्स, दीक्षा शिर्के, रमेश गजभिये यांच्या सहित अनेक अनामिक गीतकारांचे स्मरण करणे हीच त्यांच्या अजरामर कलाकृतीची आठवण होय. ■■

# बी. सी. कांबळे यांचे ऐतिहासिक योगदान




राजाराम सूर्यवंशी
मो. 9503867602



1 मे जवळ आला की प्रत्येक मराठी माणसाच्या मनात स्वाभिमानाची भावना जागृत होते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची आठवण झाली की 105 हुतात्म्यांचे बलिदान, शाहीरांच्या लढाऊ फडांचा गजर आणि असंख्य कार्यकर्त्यांचे त्याग डोळ्यांसमोर उभे राहतात. मात्र या सर्व स्मरणोत्सवात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत ज्यांचे योगदान मोठे असूनही त्याकडे तुलनेने कमी लक्ष दिले गेले आहे. त्यापैकी एक महत्त्वाचे नाव म्हणजे रिपब्लिकन चळवळीतील तरुण, तडफदार आणि अभ्यासू नेते बी. सी. कांबळे. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या काळात बी. सी. कांबळे हे अवघ्या तीस वर्षांचे तरुण आमदार होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी राजकारणात प्रवेश केला होता. डॉ. बाबासाहेबांनी त्यांच्यावर 'जनता' साप्ताहिकाची जबाबदारी सोपवली होती, यावरून त्यांच्या क्षमतेचा अंदाज येतो. 1952 च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसविरोधी उमेदवार म्हणून निवडून आलेल्या मोजक्या तरुणांपैकी ते एक होते. त्या काळात महाराष्ट्राच्या स्थापनेसाठीचा लढा अत्यंत तीव्र झाला होता. मराठी भाषिक राज्याऐवजी द्वैभाषिक राज्याची कल्पना मांडण्यात आली होती, ज्याला सर्वसामान्य जनतेने तीव्र विरोध दर्शवला. तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आंदोलन दडपण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या. ठिकठिकाणी निदर्शने, अटकसत्रे आणि पोलिसांचा गोळीबार सुरू झाला. 21 नोव्हेंबर 1955 रोजी मुंबईत झालेल्या गोळीबारात अनेक आंदोलनकर्त्यांना प्राण गमवावे लागले, तर शेकडो जखमी झाले.

या पार्श्वभूमीवर विरोधी आमदारांनी मोठ्या प्रमाणावर राजीनामे देऊन आंदोलनाला समर्थन दिले. मात्र बी. सी. कांबळे यांनी वेगळी भूमिका घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सल्ल्यानुसार त्यांनी राजीनामा न देता विधानसभेत राहून सरकारला जाब विचारण्याचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय सुरुवातीला वादग्रस्त ठरला, परंतु पुढे त्याचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित झाले. कांबळे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या माध्यमातून सरकारला अक्षरशः घेरले. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांमुळे सरकारच्या कारवायांमागील सत्य बाहेर येऊ लागले. गृहखाते मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्याकडे असल्यामुळे त्यांना प्रत्येक प्रश्नाचे उत्तर द्यावे लागत होते. कांबळे यांनी सातत्याने प्रश्न, उपप्रश्न आणि पुरावे यांच्या आधारे सरकारची कोंडी केली. ही लढाई अत्यंत कठीण होती, कारण त्यांना इतर विरोधी आमदारांची साथ नव्हती. तरीही त्यांनी एकहाती संघर्ष सुरू ठेवला. महाभारतातील अभिमन्यूने चक्रव्यूहात शिरून लढा दिला, तशीच परिस्थिती कांबळे यांच्या बाबतीत होती. मात्र त्यांनी या चक्रव्यूहातून मार्ग काढत सरकारला बचावात्मक भूमिकेत ढकलले. त्यांच्या प्रश्नांमुळे गोळीबाराच्या घटनांमागील प्रशासनिक निर्णय उघड झाले. शासनाने आंदोलन दडपण्यासाठी आधीच कठोर आदेश दिले होते, ही बाब त्यांनी सभागृहात स्पष्ट केली. त्यामुळे सरकारची मोठी नाचक्की झाली. कांबळे यांच्या या कामगिरीचा थेट परिणाम जनतेवर झाला. विधानसभेत उघड झालेली माहिती वृत्तपत्रांतून बाहेर येताच जनतेत रोष वाढला आणि आंदोलन अधिक तीव्र झाले. 'जेल भरो' सत्याग्रहाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. हजारो युवकांनी स्वयंस्फूर्तीने आंदोलनात सहभाग घेतला. तुरुंग भरून गेले आणि प्रशासनावर प्रचंड दबाव निर्माण झाला. या सर्व प्रक्रियेत बी. सी. कांबळे यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे होते. त्यांनी केवळ आंदोलनाला बळ दिले नाही, तर संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून संघर्ष कसा करावा, याचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. त्यांच्या कामगिरीमुळे संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाला वैचारिक आणि राजकीय धार मिळाली. तथापि, महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर या योगदानाची योग्य दखल घेतली गेली नाही, ही खंत व्यक्त करावी लागते. संयुक्त महाराष्ट्राच्या श्रेय नामावलीत अनेक नेत्यांची नावे घेतली जातात, परंतु बी. सी. कांबळे यांचे नाव तुलनेने कमी उच्चारले जाते. काही मराठी पत्रकार आणि विचारवंतांनी मात्र त्यांच्या कार्याची नोंद घेतली होती. इतिहासाचा न्याय हा सर्वांना समानपणे मिळायला हवा. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत ज्या ज्या व्यक्तींनी योगदान दिले, त्यांची आठवण ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. बी. सी. कांबळे यांचे कार्य हे केवळ एका व्यक्तीचे योगदान नसून, ते लोकशाही मूल्यांचे प्रतीक आहे. 1 मे महाराष्ट्र दिन साजरा करताना, हुतात्म्यांच्या बलिदानाबरोबरच अशा कार्यकर्त्यांच्या कार्यालाही उजाळा देणे गरजेचे आहे. बी. सी. कांबळे यांनी दाखवून दिले की, संघर्ष केवळ रस्त्यावरच नव्हे तर विधानसभेतही प्रभावीपणे लढता येतो. त्यांच्या या ऐतिहासिक कार्याला अभिवादन करणे, हीच खरी महाराष्ट्र दिनाची सार्थकता ठरेल. ■■

# राजकीय आरक्षण बौद्धांचा घटना दत्त अधिकार...




राजू बोरकर
मो. 7507025467



सध्या एससी मधील अ ब क ड उपवर्गीकरणाच्या विषयी मागणीने संपूर्ण राज्यात जोर धरला आहे. या प्रवर्गातील फक्त बौद्धांचा विकास झाला असा आरोप मांगांकडून आणि इतर जातींकडून होतो आहे. हा फक्त बौद्ध द्वेष आहे. म्हणून आता एससी प्रवर्गातील इतर 58 जातींना समजावण्याच्या नादात न पडता बौद्धांनी राजकीय आरक्षणाचेही उपवर्गीकरण मागावे असा विचार प्रवाह बौद्धांमधून येऊ लागला आहे. या विचार प्रवाहाला संपूर्ण राज्यातून जवळपास चांगला प्रतिसाद मिळाला. परंतु या मागणीला काही विरोधही झाला.

एका वाचकाने राजकीय आरक्षण फक्त दहा वर्षांसाठी असतो. त्याची भारतात कोणीही मागणी करीत नाही. कोणतीही सामाजिक संघटन हे आरक्षण मागत नाही. हे आरक्षण स्वतःहून काँग्रेस आणि बीजेपी वाढवत असतात. त्यातून त्यांना आरक्षित ठिकाणासाठी दलाल मिळतात. राजकीय आरक्षण मागाचे नव्हे मागायला पाहिजे. म्हणजे बौद्धांचे सुद्धा दलाल पैदा व्हायला पाहिजे नाही का? आरक्षण ही बाबासाहेबांची संकल्पना नव्हती. ती गांधींनी 'पुना पॅक' करून आपणाला दिली. आपण अलग मतदारसंघ मागत होत अशा पद्धतीने अकलेचे तारे तोडले.

अनुसूचित जातीच्या( एस सी) राजकीय आरक्षणाविषयी अशी प्रतिक्रिया देताना डॉ. बाबासाहेबांना मूर्खात काढण्यासारखे आहे. कारण अनुसूचित जातीच्या राजकीय आरक्षणाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे केवळ सवलत नसून ती शोषित समाजाच्या आत्मसन्मानाची आणि सत्तेतील समतोल प्रतिनिधित्वाची लढाई होती. संविधानात त्यांनी या तरतुदीचा समावेश करतांना दूरदृष्टी ठेवली होती. डॉ. बाबासाहेबांचे स्पष्ट मत होते की जोपर्यंत अनुसूचित जातींना संसद आणि विधानसभेत पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नाही तोपर्यंत त्यांना न्याय मिळणार नाही. राजकीय सत्तेचा वाटा असल्याशिवाय या समाजाची प्रगती अशक्य आहे, असे डॉ. बाबासाहेब यांचे मत होते आणि ते ठाम मत होते. त्यासाठी संविधान निर्मितीपूर्वी स्वतंत्र राजकीय अस्तित्व मिळवून देण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. स्वतंत्र मतदार संघाची मागणी त्यांनी याच हेतूने केली होती. परंतु या मागणीला गांधींनी विरोध केला. पुण्याच्या येरवडा कारागृहात आमरण उपोषण सुरू केले. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांना तडजोड करावी लागली. 1932 ला पुणे करार झाला. त्यानुसार स्वतंत्र मतदार संघ सोडून राखीव जागांचे तत्व मान्य करावे लागले. डॉ. बाबासाहेब स्वतः राखीव जागांना 'पांगुळवडा' म्हणत. कारण त्यात सवर्णांची मते महत्त्वाची होती. पण तत्कालीन परिस्थितीत दलितांचे राजकीय हक्क टीकविण्यासाठी त्यांनी पुणेकरारला मान्यता दिली.

थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या राजकीय संक्षमीकरणासाठी स्वतंत्र मतदार संघ ही मागणी लावून धरली होती. जी स्वातंत्र्यापूर्वीच्या दलितांच्या हक्काच्या लढ्यातील एक कळीचा मुद्दा होता. कलम 330 लोकसभा, कलम 332 विधानसभा, कलम 343 D ग्रामपंचायत, कलम 243 T नगरपालिका आणि महानगरपालिकामध्ये अशा प्रकारे अनुसूचित जातीच्या व्यक्तींना देशाच्या आणि राज्याच्या कायदेमंडळात प्रतिनिधित्व सुनिश्चित केले जाते. कलम 334 अन्वये हे आरक्षण दहा वर्षांसाठी होते. राजकीय आरक्षणाला काही बिनडोक ही डॉ. बाबासाहेबांची मागणी नव्हती असे सांगतात. हे बिनडोक आरक्षण पुणे करारात गांधींनी दिले असे अकलेचे तारे तोडतात. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांच्या संघर्षाला आणि संविधानातील अनुसूचित जातीच्या राजकीय आरक्षण विषयक कलमांना शून्य किंमत मिळते. पुढे हे बिनडोक असेही म्हणतात की राजकीय आरक्षण फक्त दहा वर्षांसाठी होते. काँग्रेस-भाजप यांनी दलाल निर्माण करण्यासाठी ते वाढवून घेतले. प्रश्न असा आहे की डॉ. बाबासाहेबांनी दलाल निर्माण करण्यासाठी आरक्षण दिले आहे का? संविधान निर्मितीत डॉ. बाबासाहेबांच्या मनाविरुद्ध अनेक गोष्टी घडल्या. त्या डॉ. बाबासाहेबांनी मोठ्या दुःखाने स्विकारल्या. स्वतंत्र मतदार संघऐवजी राखीव मतदार संघ ही देखील एक तडजोड होती आणि ते स्विकारणे दलितांच्या हिताचे होते. पण डॉ. बाबासाहेबांनी दिलेले हे आरक्षण जणू गांधींनी आपल्या बटव्यातून दिले असा संदेश त्यातून जातो. दहा वर्षांची मर्यादा संपल्यानंतर राज्यकर्त्यांनी ते वाढवून दिले म्हणजे त्यांच्या खिशातून दिले असा अर्थ होत नाही. तर त्यासाठी डॉ. बाबासाहेबांच्या संविधानाचाच आधार घ्यावा लागला. हे आरक्षण पुढील 2030 पर्यंत राहणार. या कालावधीत कोणत्याही राजकीय पक्षाने राजकीय आरक्षण नाकारले नाही आणि कोणत्याही अनुसूचित जातीच्या उमेदवाराने ते नाकारले नाही. याचा अर्थ डॉ. बाबासाहेबांनी दिलेले दहा वर्षांसाठीचे राजकीय आरक्षण भाजप, सेना, काँग्रेसची मजबुरी झाली. म्हणूनच राज्यसभा आणि विधान परिषदेत राखीव जागांची तरतूद नसली तरी काँग्रेसने चंद्रकांत हांडोरे आणि शिवसेना एकनाथ शिंदे गट यांनी ज्योती वाघमारे या दलितांना प्रतिनिधित्व दिले.

सामाजिक संघटन म्हणून सध्या बामसेफचे अध्यक्ष वामन मेश्राम हे उद्या समजा भारत मुक्ती मोर्चा या त्यांच्याच शाखेच्या माध्यमातून राजकारण करायचे झाल्यास उपलब्ध राजकीय आरक्षण पुणे करारात गांधींनी दिले म्हणून ते नाकारणार आहेत का? राखीव जागांवर उमेदवार उभे करणार नाही का? हा प्रश्नच आहे. सवर्ण हिंदूंना राखीव जागा द्यायच्या असत्या तर त्या त्यांनी स्वखुशीने दिल्या असत्या. काँग्रेसचे सर्वेसर्वा मोहनदास करमचंद गांधी यांनी अशी घोषणाच केली असती. पण सवर्णांच्या मनात ते नव्हतेच. डॉ. बाबासाहेबांनी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी रेटल्यामुळे गांधी राखीव मतदार संघ द्यायला तयार झाले. पाच दहा मिनिटात ही जादू झाली नाही. त्याला डॉ. बाबासाहेबांच्या संघर्षाचा इतिहास आहे. पुणेकरारात गांधींचे प्राण गेले असते तर दलितांवरील अत्याचार वाढले असते. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांनी राखीव जागांच्या संदर्भात वैचारिक भूमिका स्वीकारली आणि ती भूमिका दलितांच्या हिताची होती. कारण दलितांना सत्तेपर्यंत नेणे हे डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न होते. जे केले ते सर्वांसमोर आहे. काही शेंबडे याला डॉ. बाबासाहेबांचा पुणे करारातील पराभव मानतात. किंवा राजकीय आरक्षण गांधींनी दिले म्हणतात. त्यांच्या बुद्धीची कीव करावी तेवढी कमी आहे असे वाटते.

अ ब क ड उपवर्गीकरण होईल त्यात बौद्धांचे राजकीय भवितव्य काय? हा प्रश्न उभा राहील. त्यामुळे बौद्धांनी आपल्या राजकीय आरक्षणासाठी सज्ज झालेच पाहिजे आणि हे आरक्षण टिकविण्यासाठी प्रयत्न केलेच पाहिजे. कारण पुणेकरारानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'माझ्या सर्व मागण्यांना गांधींनी मान्यता देऊन माझेच अभिनंदन केले. गांधींनी ही तडजोड दुसऱ्या राउंड टेबल परिषदेमध्ये मान्य केली असती तर आजचे बिकट व भयानक असे वातावरण तयार झाले नसते.' (जनता, 1/10/1932) राजकीय आरक्षण हे डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न होते. ते तडजोडीतून मिळाले असले तरी डॉ. बाबासाहेबांनी दलित, पीडित, शोषितांना त्या आधारे सत्तेची दारे उघडी करून दिली. राजकीय आरक्षण हा दलितांचा घटनात्मक हक्क आहे. हक्काचे संवर्धन करणे सर्व दलितांची जबाबदारी आहे. ■■

# कागद नाहीत, म्हणून अस्थी पुरावा
# नियम मोठे की माणूस?




संपत दुर्गे,
मो. 9511701485



भारताची खरी वास्तविकता काय आहे, हे कधी कधी अशा घटनांमधून समोर येते ज्या आपल्याला अस्वस्थ करतात, पण डोळे उघडायला भाग पाडतात. ओडिशामधल्या केंदुझार जिल्हा येथे घडलेली घटना त्याच प्रकारची आहे. एका आदिवासी माणसाने आपल्या बहिणीचे अस्थी अवशेष बँकेत नेले. फक्त रू.19,300/- काढण्यासाठी. हे ऐकताना आपल्याला धक्का बसतो; पण ही केवळ एका व्यक्तीची कथा नाही, तर संपूर्ण व्यवस्थेची मर्यादा दाखवणारी घटना आहे.

ओडिशा ग्रामीण बँकने मृत्यू दाखल्याची मागणी केली. नियमाप्रमाणे ते बरोबरच आहे. पण प्रश्न असा आहे की, जे लोक अजूनही शिक्षण, माहिती आणि प्रशासनापासून दूर आहेत, त्यांच्यासाठी हे नियम किती व्यवहार्य आहेत? आदिवासी भागात आजही अनेकांना सरकारी प्रक्रिया समजत नाहीत. 2011 च्या जनगणनेनुसार आदिवासी साक्षरता दर सुमारे 59टक्के आहे, जो राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. अनेक दुर्गम भागांमध्ये मृत्यू नोंदणी पूर्णपणे होत नाही म्हणजेच कागदावर त्या व्यक्तीचे अस्तित्वच नाही. तो माणूस चुकीचा नव्हता; तो फक्त हतबल होता. त्याच्या जगात 'पुरावा' म्हणजे प्रत्यक्ष वास्तव कागद नव्हे. म्हणूनच त्याने बहिणीचे अवशेष घेऊन जाऊन दाखवले. ही गोष्ट आपल्याला सांगते की व्यवस्थेचा विचार आणि सामान्य माणसाचे जगणे यात किती मोठी दरी आहे.

फ्रेंच तत्त्वज्ञ मिशेल फुको म्हणतो, 'सत्ता आणि ज्ञान हे एकमेकांशी जोडलेले असतात.' ज्यांच्याकडे माहिती आणि ज्ञान आहे, त्यांच्याकडेच नियंत्रण असते. इथेही तेच दिसते व्यवस्थेची भाषा, नियम आणि प्रक्रिया ज्यांना समजतात, तेच त्याचा फायदा घेऊ शकतात. बाकीचे लोक बाहेरच राहतात.

आदिवासी समाज आजही अनेक अडचणींना सामोरा जातोय. शिक्षणाचा अभाव, आरोग्य सुविधांची कमतरता, आर्थिक साक्षरतेचा अभाव आणि प्रशासनापर्यंत पोहोचण्याची अडचण. आपण 'विकास' म्हणतो, पण तो सगळ्यांपर्यंत समान पोहोचलेला नाही. बँक खाते उघडणे सोपे झाले असेल, पण त्या खात्याचा उपयोग कसा करायचा हे अजूनही अनेकांना माहित नाही. ही घटना आपल्याला 'संरचनात्मक अन्याय' समजून देते. कुणी थेट अन्याय करत नाही, पण व्यवस्था अशी आहे की ती दुर्बल लोकांना मागे टाकते. त्या माणसाला कुणी सांगितले नाही की असे कर; पण परिस्थितीने त्याला तिथपर्यंत नेले. त्या माणसाचा फोटो तो शांत बसलेला आणि बाजूला बहिणीचे अवशेष हा फक्त एक क्षण नाही, तर एक प्रश्न आहे. शहरात बनणाऱ्या धोरणांचा आणि गावातल्या वास्तवाचा काही संबंध आहे का? शेवटी, ही घटना आपल्याला एकच गोष्ट सांगते भारत प्रगती करत आहे, पण सगळ्यांसाठी समान गतीने नाही. कारण खरी गोष्ट अशी आहे, प्रश्न हा नाही की त्या माणसाने असे का केले, प्रश्न हा आहे की त्याच्याकडे दुसरा मार्ग का नव्हता. ■■

स्वाभिमानाचे स्मरणशिल्प १३४

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा सुगत नगर नागपूर



उत्तर नागपूर शहरातील प्रत्येक सोसायटी, पेठ, नगर, वस्तीत बुद्ध विहार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे आहेत. मानकापूर ते कामठी नागपूर रिंग रोड वर सुगत नगर सिव्हिल लाईन्स आहे येथिल सुगत बुद्ध विहार परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. येथे नियमित कार्यक्रम होतात.

शेषराव कांबळे
9850239734

## महत्वाचे

### ‘अंतिम सत्य’ नाटकाचा प्रयोग 3 मे रोजी

**नागपूर :** महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गौतम बुद्ध यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त मानव कल्याण अभ्यासीका शताब्दी नगर येथे ‘अंतिम सत्य’ या नाटकाचा विशेष प्रयोग आयोजित करण्यात आला आहे.

रविवार, दि. 3 मे 2026 रोजी सायंकाळी 7 वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात हृदयस्पर्शी प्रसंगांवर आधारित ‘अंतिम सत्य’ नाटकाचे सादरीकरण करण्यात येणार आहे. या नाटकाचे लेखन, दिग्दर्शन व पार्श्वसंगीत आ. सारनाथ रामटेके यांनी केले असून सुप्रिया वालदे व अतुल गोरखेडे हे कलाकार प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. तंत्रनिदेशन अश्विन नाईक यांचे आहे. हा कार्यक्रम शताब्दी नगर बुद्ध विहार येथे आयोजित करण्यात आला असून सामाजिक व बौद्ध मूल्यांवर आधारित हा नाट्यप्रयोग प्रेक्षकांना विचारप्रवृत्त करणारा ठरणार आहे. कार्यक्रमास उपासक-उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा संगीता म्हैसकर यांनी केले आहे.

### धम्मप्रभास बुद्ध विहार पवनीत बुद्ध जयंती सोहळा

**पवनी :** बुद्ध नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भंडारा जिल्ह्यातील पवनी येथे वैशाख पोर्णिमेनिमित्त बुद्ध जयंती सोहळा धम्म रॅली, तथागत बुद्धांच्या जीवन चरित्रावर मानवतेचा संदेश देणाऱ्या झाकी व बुद्ध - भीम गीतांवर मुलींचे नृत्य यातून बुद्धांचा संदेश पवनी नगरीत देण्यात आला. धम्म रॅलीत पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून मोठ्या संख्येने धम्म अनुयायी सहभागी झाले होते.



धम्मप्रभास बुद्ध विहार गौतम वार्ड येथे महापरित्राण पाठ आयोजन करण्यात आले होते. धम्म सेवक सुमेर गजभिये यांनी सुत्त पठण करून उपासकांना धम्माचे महत्व परित्राण पाठातून विशद केले. धम्मसेवक एकनाथ बागडे यांनी यावेळी बुद्ध जयंती व वैशाख पोर्णिमेचे महत्व आपल्या उद्बोधनातून व्यक्त केले.

### 1 मे ते 15 मे सर्वांगीण सुसंस्कार शिबिर

**मोझरी :** दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिराचे गुरूकुलात आयोजन केले असून, 1 मे ते 15 मे या कालावधीत शिबिर पार पडणार आहे.

शिबिराचा प्रारंभ 1 मे रोजी सायंकाळी प्रार्थनेने झाला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन सोहळा झाला.

या शिबिरात महाराष्ट्र, तेलंगणा व मध्यप्रदेश या राज्यांमधून सुमारे 100 विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे हे शिबिर विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व मूल्याधारित उपक्रमांमुळे विशेष ठरत असून, सहभागी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले आहे.

शिबिराद्वारे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संस्कार, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकी यांचा विकास होण्यास मदत होत आहे.



### कामगार दिनी रेल्वे कर्मचाऱ्यांनी केला व्यसनमुक्तीचा संकल्प

**नागपूर :** नॅशनल रेल्वे मजदूर युनियनच्या वतीने कामगार दिनानिमित्त नशामुक्त भारत अभियानात अंतर्गत व्यसनमुक्तीची शपथ घेण्यात आली.

यावेळी नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक गौरव आळणे यांनी उपस्थित कामगारांना व्यसनमुक्तीचा संकल्प दिला. व्यासपीठावरील उपस्थित मान्यवर अध्यक्ष आर. ओ. चौधरी, उपाध्यक्ष आर. ए. छत्रे, वनाजी कोशी, भोयर, साजिद भाई, अनुराग लोखंडे, ए. के. पांडे आदी मान्यवरांच्या हस्ते व्यसनमुक्तीपर महामानवांचे विचार पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. कामगारांना त्यांच्या विविध न्याय मागण्यांचे स्मरण करण्यात आले. यावेळी शेकडो रेल्वे कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे संचालन मनीष बारस्कर यांनी केले तर आभार माधुरी उराडे यांनी मानले.

# ‘बुद्धम् शरणं गच्छामि’च्या निनादात नागपुरात मैत्री बंधुभाव प्रभात रॅली

## दीक्षाभूमीवर सांगता





**नागपूर :** बुद्ध पूर्णिमा निमित्त ‘चलो बुद्ध की ओर’ या घोषवाक्याने शहरात भव्य मैत्री बंधुभाव प्रभात रॅलीचे आयोजन करण्यात आले. ‘बुद्धम् शरणं गच्छामि, धम्मं शरणं गच्छामि, संघं शरणं गच्छामि’ या जयघोषात निघालेल्या रॅलीची सांगता दीक्षाभूमी येथे झाली.

सकाळी 7 वाजता प्रियदर्शी सम्राट अशोक चौक येथून रॅलीची सुरुवात पंचशील ध्वज फडकावून करण्यात आली. यावेळी संत साहित्य अभ्यासक ज्ञानेश्वर रक्षक, ख्रिस्ती उपदेशक तारेश तायडे, भिक्खुनी विसाखा, भिक्खुनी करुणाशीला, भिक्खुनी मेताचिता, संविधान परिवाराचे मुख्य संयोजक प्रा. राहुल मून, रमेश पिसे, अरुण गाडे, माजी न्यायमूर्ती नरेश बनसोड, इंजी. भूषण मून यांची प्रमुख उपस्थिती होती.

रॅलीसाठी सुशोभित रथावर गौतम बुद्ध यांची पांढरीशुभ्र मूर्ती विराजमान करण्यात आली होती. श्रामणेर वेशातील मुलींनी बुद्ध वंदना करत वातावरण प्रसन्न केले. रॅली सम्राट चौक, मेडिकल चौक, जाटतरोडी चौक, लोकमत चौक मार्गे पुढे सरकत विविध ठिकाणी स्वागत करण्यात आले. मेडिकल चौक येथे भूषण मून मित्र परिवाराने पुष्प वर्षाव करून भिक्खू संघाला केळी, पाणी व अन्य वस्तूंचे दान केले. जाटतरोडी चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर प्रशांत ढाकणे मित्रपरिवाराने स्वागत करून फळांचे वितरण केले. तसेच नालंदा बुद्ध विहार येथे उपासक-उपासिकांनी पाणी व बिस्किटांचे वाटप करत रॅलीत सहभाग नोंदवला.

रॅली दीक्षाभूमी येथे पोहोचल्यावर बौद्धप्रिय वा. को. गाणार जन्मशताब्दी समितीच्या वतीने सहभागी नागरिकांना शिरा वाटप करण्यात आला. शेवटी गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन करून रॅलीची सांगता करण्यात आली. या रॅलीत शेकडो उपासक-उपासिका मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शांतता, मैत्री, करुणा आणि बंधुभावाचा संदेश देणारी ही रॅली शहरात उत्साहात पार पडली.

# अनंत बदर समितीचा अहवाल रद्द करा

## दलित संघटनांची मागणी..



**नाशिकरोड :** उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समिती नाशिक यांच्यावतीने नाशिक विभागाचे महसूल अप्पर आयुक्त अरविंद लोखंडे यांची भेट घेऊन निवेदन दिले.

महाराष्ट्र सरकारने अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करण्यात येऊ नये अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला. कुठल्याही प्रकारचा डाटा उपलब्ध नसताना उपवर्गीकरण करण्याचा डाव हाणून पाडण्यात येईल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व अनुसूचित जातीच्या लोकांना एकत्र राहण्यासाठी उपदेश केला आहे त्यात फूट पाडू नये असा इशारा समितीच्यावतीने देण्यात आला व अनंत बदर समितीचा अहवाल सरकारने तात्काळ रद्द करावा अन्यथा राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा सर्व दलित संघटनेच्या नेत्यांनी दिला.

याप्रसंगी समितीच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्मकार खाटीक आणि मातंग समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

समितीचे प्रमुख मार्गदर्शक माजी न्यायाधीश अनिल वैद्य, समितीचे अध्यक्ष प्रकाशजी पगारे, मुख्य निमंत्रक महाराष्ट्ररत्न अनिल गांगुर्डे, मुख्य निमंत्रक डॉ. अविनाश शिंदे, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय महासचिव दत्तात्रय गोतीसे, खाटीक समाजाचे नेते तथा माजी नगरसेवक लक्ष्मण मंडाले, मातंग महासंघाचे राष्ट्रीय नेते बब्रुवान शिंदे, खाटीक समाजाचे नेते राजेंद्र क्षीरसागर, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे सचिव प्रमोद वानखेडकर, तसेच समितीचे मार्गदर्शक वामनराव गायकवाड, एकनाथ मोरे, अरुण भालेराव, ॲड. राजन शिंदे, डॉ. प्रवीण गांगुर्डे, पी. कुमार धनविजय, मुकुंद काळे, कांचन जाधव, हनुमंत काळे, अरुण दोंदे, राहुल जगताप, शिवाजीराव गायकवाड, ॲड. प्रशांत खरे, युवराज शेगावकर, सुरेश गांगुर्डे, प्रतीक पगारे, ॲड. राजन शिंदे, डॉ. अशोक भालेराव, सुनिल साखरे, पत्रकार भास्कर साळवे, पत्रकार प्रवीण नेटावणे, प्रशांत गांगुर्डे आदी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते!

# त्रिविध बुद्ध पूर्णिमेनिमित्त रुयाड येथे धम्मोत्सव व रक्तदान शिबिर



**भंडारा :** त्रिविध पावन बुद्ध पूर्णिमा निमित्त महासमाधिभूमि महाविहार रुयाड येथे पञ्ञा मेत्ता संघाच्या वतीने भव्य धम्मोत्सव उत्साहात साजरा केला.

कार्यक्रमाची सुरुवात गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि देंग्यों दाइशि साइच्यो यांच्या प्रतिमांना दीप, अगरबत्ती व पुष्पमाला अर्पण करून झाली. त्यानंतर पूज्य भदन्त संघरत्न मानके (अध्यक्ष, पञ्ञा मेत्ता संघ) यांनी त्रिशरण व पंचशील ग्रहण करून घेतले व सुत्त पठण करण्यात आले.

प्रवचनात भदन्त संघरत्न मानके यांनी त्रिविध बुद्ध पूर्णिमेचे महत्त्व स्पष्ट करताना सर्वांच्या जीवनात बोधी ज्ञान निर्माण व्हावे आणि सर्व प्राणीमात्रांना बुद्धत्व प्राप्त व्हावे, अशी मंगलकामना व्यक्त केली. त्यांनी शील, समाधी आणि प्रज्ञा यांच्या आधारे धम्म आचरण करण्याचा संकल्प उपस्थितांना करण्याचे आवाहन केले.

याच उपलक्ष्याने जिल्हा रुग्णालय भंडारा येथील ‘रक्तपेढी’च्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. अनेकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

कार्यक्रमात सुत्त पठण, धम्म प्रवचन आणि रक्तदानाच्या माध्यमातून बौद्ध धम्मातील करुणा, शांती आणि प्रज्ञेचा संदेश देण्यात आला. उपस्थित उपासक-उपासिकांनी बुद्ध पौर्णिमेच्या पावन संदेशानुसार जीवनात शांतता, करुणा आणि प्रज्ञा अंगीकारण्याची प्रतिज्ञा केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पञ्ञा मेत्ता बालसदनच्या उपासिका आर्या शामकुवर, प्राची तेंभुर्णे आणि ऊर्वशी कांबळे यांनी बौद्ध गीत सादर करून वातावरण भक्तिमय केले.

या धम्मोत्सवाच्या यशासाठी पत्त्राा मेत्ता संघाचे विश्वस्त, महासमाधिभूमि दायक समिती व सुजाता महिला मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता खीर वितरणाने करण्यात आली.

# वणी येथे महाराष्ट्र दिनी विदर्भवाद्यांचे आंदोलन

## ‘काळा दिवस’ म्हणून निषेध, 65 वर्षांच्या अन्यायाचा आरोप; विदर्भावर जबरदस्तीने लादलेल्या विलिनीकरणाविरोधात संताप



**वणी :** महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने विदर्भवाद्यांच्या वतीने आज वणी येथे ‘काळा दिवस’ पाळत तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. स्थानिक छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित आंदोलन व निदर्शन करण्यात आले आंदोलनकर्त्यांनी घोषणाबाजी करत महाराष्ट्र स्थापनेपासून विदर्भावर सातत्याने अन्याय होत असल्याचा आरोप केला. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली, मात्र त्या वेळी विदर्भाला स्वतंत्र राज्याचा दर्जा न देता जबरदस्तीने महाराष्ट्रात विलीन करण्यात आले, असा ठाम आरोप यावेळी करण्यात आला. गेल्या 65 वर्षांत विदर्भातील शेतकरी, तरुण, उद्योग आणि पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रांमध्ये अन्याय झाल्याचे आंदोलकांनी नमूद केले.

या आंदोलनात उपस्थितांनी शेतकरी आत्महत्या, वाढती बेरोजगारी, कुपोषण, अपुरी सिंचन व्यवस्था, उद्योगांचा अभाव आणि वीज दरवाढ या प्रमुख मुद्द्यांकडे लक्ष वेधले. ‘विदर्भाला न्याय द्या’, ‘स्वतंत्र विदर्भ राज्य द्या’ ‘निषेध असो, निषेध असो, महाराष्ट्र दिनाचा निषेध असो’ अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

या प्रसंगी प्रा. पुरुषोत्तम पाटील, रफिक रंगरेज, ॲड. राहुल खारकर, बाळासाहेब राजुरकर, देवराव धांडे, अजय धोबे, अमित उपाध्ये, नामदेव जनेकर, संजय चिंचोलकर, विकेश पानघाटे, पुंडलिक पथाडे, अशोक चौधरी, वी. भी. टोंगे, गजेंद्र भोयर, प्रभाकर उईके, होमदेव कन्नाके, उद्धव हेपट, कृष्णदेव विधाते, काशिनाथ जेउरकर यासह विदर्भवादी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आरक्षित प्रवर्गातील सेवाज्येष्ठ कर्मचाऱ्यांना पदोन्नती नाकारणे अन्यायकारक

## मुंबई उच्च न्यायालयाचा दिलासा

**नागपूर :** मुंबई उच्च न्यायालयाने आरक्षित प्रवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीसंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय देत, केवळ 25 मे 2004 चा शासन आदेश रद्द झाल्यामुळे सेवाज्येष्ठ उमेदवारांना पदोन्नतीपासून वंचित ठेवता येणार नाही, असे स्पष्ट केले आहे.

न्यायमूर्ती श्याम चांडक आणि न्यायमूर्ती सुमन श्याम यांच्या द्विपीठाने शिवशंकर रमेश भोसले विरुद्ध भिवा हरिश्चंद्र सावंत या प्रकरणात हा निकाल दिला. या निर्णयानुसार, सेवाज्येष्ठतेत वरच्या क्रमांकावर असलेल्या आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना केवळ आरक्षणाचा लाभ घेतला म्हणून पदोन्नती नाकारणे योग्य ठरणार नाही. न्यायालयाने नमूद केले की, ज्या प्रकारे खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणाच्या अधीन राहून पदोन्नती दिली जाते, त्याचप्रमाणे आरक्षित प्रवर्गातील कर्मचाऱ्यांनाही समान निकष लागू करणे आवश्यक आहे.

सदर प्रकरणात 7 मे 2021 च्या शासन आदेशाद्वारे आरक्षित प्रवर्गातील सुमारे 33टक्के पदे खुल्या प्रवर्गात समाविष्ट करून अनेक कर्मचाऱ्यांना पदोन्नतीपासून वंचित ठेवण्यात आले होते. या धोरणामुळे राज्यातील अंदाजे 90 ते 95 हजार मागासवर्गीय कर्मचारी प्रभावित झाल्याचे सांगितले जाते.

न्यायालयाने आपल्या निरीक्षणात नमूद केले की, सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या एसएलपी (ष्ट) क्र. 28306/2017 मध्ये अंतिम निर्णय होईपर्यंत कोणतेही अंतिम मत व्यक्त करता येणार नाही. मात्र, तोपर्यंत नियमांनुसार आरक्षित व खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरत्या पदोन्नती देण्यास परवानगी देण्यात आली आहे.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनाने या निर्णयाचे स्वागत करत 7 मे 2021 चा शासन आदेश रद्द करून सुधारित आदेश जारी करण्याची मागणी केली आहे. संघटनेचे प्रतिनिधी नरेंद्र जारोंडे यांनी राज्य शासनाने सेवाज्येष्ठतेच्या अटींमध्ये सवलत देऊन मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी भूमिका मांडली आहे.हा निर्णय आरक्षित प्रवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी दिलासा देणारा ठरत असून पदोन्नती प्रक्रियेत समतोल राखण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे मानले जात आहे.



## ‘सिद्धार्थाचा हंस’ पुस्तकाचे प्रकाशन

**कळंब :** पुरूषोत्तम संबोधी लिखित ‘सिद्धार्थाचा हंस’ या बालकविता संग्रहाचे प्रकाशन बुद्ध जयंतीच्या दिवशी अगदी हर्षोल्लोसात संपन्न झाले. हा कार्यक्रम कळंब, जि. यवतमाळ येथील तथागत बुद्ध विहारात आयोजित करण्यात आला. हा बालकविता संग्रह असल्यामुळे बाल कुमारांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले; ही अनन्यसाधारण महत्वपूर्ण घटना आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते आणि साहित्यिक पुनेश्वर चांदवे होते. विहारातील उपस्थित जनसमुदायासमोर आपले विचार व्यक्त करतांना ते म्हणाले, या पुस्तकातील कविता कुमार सिद्धार्थ आणि बुद्धकालीन ऐतिहासिक प्रसंगावर आधारित असून अतिशय सोप्या शब्दांत आणि ओघवत्या गेय शैलीत लिहिल्या आहेत, त्यामुळे त्या लहान मोठ्या सगळ्याच मंडळींना निश्चितच आवडतील. या प्रसंगी श्रद्धा भगत यांनी आभार व्यक्त केले.

# ‘बुद्ध धम्मात स्त्रियांचे अमूल्य योगदान’

## नागपूर विमानतळावर बुद्ध जयंती उत्साहात साजरी



**नागपूर :** बुद्ध पूर्णिमा निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे गौतम बुद्ध यांच्या 2570 व्या जयंतीचा कार्यक्रम उत्साहात साजरा केला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. विनायक हाडके यांनी सामूहिक बुद्ध वंदना घेतली. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी डॉ. सरोज आगलावे उपस्थित होत्या. त्यांचा ब्ल्यू क्लबचे अध्यक्ष विद्याधर सोनटक्के व विनायक हाडके यांच्या हस्ते पंचशील शेला, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. यानंतर ब्ल्यू क्लबचे मुख्य समन्वयक अविनाश कठाणे यांनी संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली.

प्रबोधनपर भाषणात डॉ. सरोज आगलावे यांनी ‘बुद्ध धम्मामध्ये स्त्रियांचे अमूल्य योगदान’ या विषयावर विचार मांडले. त्यांनी भिक्खुणी पट्टाचारा, आम्रपाली, विशाखा, किसा गौतमी, उत्पलवर्णा आदींच्या कार्याचा उल्लेख करत बौद्ध धम्मातील स्त्रियांच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच आजच्या काळातही स्त्रियांचा सहभाग वाढवून धम्माचे आचरण व संघभावना जपणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात विद्यासागर गवळी, उत्तम शेंडे व अविनाश कठाणे यांनी बुद्ध व भीमगीते सादर करून वातावरण भारावून टाकले.

कार्यक्रमाचे संचालन ब्ल्यू क्लबचे सचिव महेंद्र जीवने यांनी केले, तर सुनील पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. शेवटी खीर, अल्पोपहार व ताक वितरण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पुरुषोत्तम निमसरकार, अरविंद थूल, प्रदीप धनविज, आशिष फुलझेले, गौतम मोडक, आनंद वासनिक, सुनील वाकोडे, सुधाकर लोखंडे, सुरेंद्र चंदेवाल, हिरामण वाघमारे, किशोर नगराळे, महेश टेंभुर्णे, राजेश हाडके आदींचे विशेष सहकार्य लाभले.

# वानाडोंगरीत ‘वारसा संत व महापुरुषांचा’ सादर



**हिंगणा :** वानाडोंगरी परिसरात महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि विविध महापुरुषांच्या संयुक्त जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेला ‘वारसा संत व महापुरुषांचा’ हा सामाजिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम अत्यंत उत्साहात हनुमान नगर येथे झाला. सामुदायिक प्रार्थना आणि प्रभात फेरीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. नागरिक, युवक-युवती, महिला तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थनेनंतर संत गाडगेबाबा यांच्या वेषभूषेत प्रबोधनकार सतीश सोमकुवर यांनी स्वच्छता, समाजप्रबोधन आणि महापुरुषांच्या विचारांचा प्रचार-प्रसार या विषयांवर आधारित सादरीकरणाने नागरिकांना विचार करायला भाग पाडले. ‘महापुरुषांच्या विचारांची अग्नी तेवत ठेवा’ असा प्रभावी संदेश देत राष्ट्रीय युवा प्रबोधनकार सतीश रा. सोमकुंवर व त्यांच्या संचाने प्रभावी मार्गदर्शन केले, ज्याला उपस्थितांकडून भरभरून दाद मिळाली.

यावेळी सतीश सोमकुंवर व संच यांनी महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्याची गरज अधोरेखित केली. समाजातील अंधश्रद्धा आणि भोंदू बाबांच्या फसवणुकीबाबत प्रत्यक्ष प्रयोग सादर करून नागरिकांना सावध राहण्याचा संदेश देण्यात आला. ‘भोंदू बाबांकडे गेल्यावर आपण कसे फसतो’ याचे जिवंत प्रात्यक्षिक दाखवून उपस्थितांना जागृत करण्यात आले.

तसेच व्यसनमुक्ती बाबत जनजागृती करत युवकांना योग्य मार्गावर येण्याचे आवाहन करण्यात आले.

विशेष म्हणजे, कार्यक्रम सुरू असताना एकही नागरिक मध्येच उठून गेला नाही, हीच कार्यक्रमाच्या यशाची खरी पावती ठरली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विनायक इंगळे उपस्थित होते, तर सत्कारमूर्ती म्हणून आशीष फुलझेले यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला नगराध्यक्षा सुनंदा बागडे, उपाध्यक्षा चंदा अजमिरे मार्गदर्शन केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारमंच, नागपूर तसेच मानव अधिकार संरक्षण मंच, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रमोद जयसिंगपुरे, होमेश्वर नानवटकर, दिवाकर बेले, सुनील घागरे, आमुरकर, नंदकिशोर घडेकर, सुनील खुमकर, अशोक सायने, सुरज आमुरकर, प्रवीण नगराळे, चित्रा सायने, भूपेश चनोडे, आदर्श आडीकाने, राकेश रामटेके, प्रणय आडीकाने, आलोक गजभिये, सौरभ जामगडे, अमर तिरपुडे, इतर सर्व नागरिकांनी परिश्रम घेतले असून, नागरिकांनीही मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून या सामाजिक उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# महां अंनिसची भंडारा शाखा पुनर्गठित



**भंडारा:** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची भंडारा शाखा नुकतीच पुनर्गठित करण्यात आली. या प्रसंगी केंद्रीय निरीक्षक म्हणून राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे व प्रधान सचिव डॉ. सुनील भगत उपस्थित होते. या शाखेचे अध्यक्ष म्हणून जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा.वामन शेडमाके यांची सर्वानुमते निवड करण्यात आली, तर कार्याध्यक्ष म्हणून प्रा पुरुषोत्तम शहारे यांची निवड करण्यात आली. इतर नवपदाधिकारी येणेप्रमाणे.. उपाध्यक्ष शंकर चेटूले, प्रधान सचिव - मनोहर टिचकूले, बुवाबाजी संघर्ष कार्यवाह -विनोद बोधी, वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प -लिलाधर वासनिक ,वार्तापत्र प्रकाशन कार्यवाह - विरेंद्र गजभीए महिला सहभाग कार्यवाह - सुरेखा सेडमाके , विविध उपक्रम कार्यवाह - वसंत सोमकूंवर, जातीअंत विभाग श्रीवंत तितरमारे, मुख्य सल्लागार राजकूमार बौद्ध इत्यादी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. सभेची कार्यवाही नागपूर जिल्हा कार्याध्यक्ष चित्तरंजन चौरे यांनी पार पाडली तर देवयानी भगत यांनी संविधान उद्धेशीकेचे वाचन केले. प्रास्ताविक डॉ. सुनिल भगत यांनी केले तर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ची उद्दिष्टे व कार्यपद्धती यावर राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी विस्तृत माहिती दिली.

नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांचे नागपूर जिल्हा पदाधिकाऱ्यांद्वारे वार्तापत्र पुस्तकं व माहीती पत्रकं देऊन स्वागत करण्यात आले. नव्या कार्यकारिणी ला शुभेच्छा देताना प्रा पुष्पा घोडके म्हणाल्या की भारतीय घटनेच्या कलम 51ए प्रमाणे अंधश्रद्धा निर्मूलन करने हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे व हे पुण्याचे कार्य आपल्या हातून उत्तम प्रकारे होवो त्यासाठी तुम्हाला मी हार्दिक शुभेच्छा देते. प्रा वामन शेडमाके यांनी आभार मानले. यावेळी शहरातील अनेक जेष्ठ मान्यवर उपस्थित होते.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648